# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन,
# जिल्हा परिषद,कोल्हापूर

---

जा.क्र.कोजिप/जिपास्वमि/६०१/२०१७ — दि.१०/११/२०१७

प्रति,

गट विकास अधिकारी,

पंचायत समिती,--------------(सर्व)

विषय - प्लास्टिक पिशवी वापर बंदी बाबतची प्रभावी अंमल बजावणी करणेबाबत.

संदर्भ - १) जा.क्र.जिपको/DWSM/कावि-मविशा-१/१९/२०१७, दि.१४/०९/२०१७

२)जलव्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्षा व मा.मु.का.अ,जि.प.कोल्हापूर यांनी दिलेल्या सूचना दि.९/११/२०१७.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१ अन्वये आपणास ग्राम पंचायत स्तरावर प्लास्टिक निर्मुलन मोहिमेअंतर्गत प्लास्टिक पिशवी वापर बंदीबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.या सूचनेनुसार सर्व पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली प्लास्टिक निर्मुलन सनियंत्रण समिती गठीत करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

सर्व तालुक्यामध्ये याप्रमाणे समिती गठीत करणेत आलेल्या आहेत.तसेच स्वच्छता ही सेवा अभियान कालावधीमध्ये ग्राम पंचायत स्तरावर दुकानदार व खाद्यपदार्थ विक्रेत्यांना प्लास्टिक पिशवी बंदीबाबत नोटीस वाटप ही करण्यात आले आहे.या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी खालीलप्रमाणे त्वरीत कार्यवाही करणेत यावी.

१) प्लास्टिक निर्मुलन उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर संदर्भ क्र.१ मधील मुदद्ा क्र.५ नुसार होणा-या दंडात्मक कार्यवाहीबाबत सूचना/माहिती फलक गावाच्या सार्वजनिक ठिकाणी लावणे आवश्यक आहे.यासाठी आपले अधिनस्त सर्व ग्राम पंचायतींमध्ये सूचनाफलक लावणेबाबत सुचित करणेत यावे.यासाठी आवश्यक असा सूचनाफलक मसुदा या कार्यालयाकडून पुरवठा करण्यात येईल.

२) वरील प्रमाणे या गठीत केलेल्या समितीमार्फत दर महिन्याला ग्राम पंचायतमधील सर्व दुकानदार व खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या दुकानवरती धाडी टाकून प्लास्टिक पिशव्या आढळून आल्यास दंडात्मक कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे.मात्र याप्रमाणे अद्याप कोणत्याही तालुक्यामध्ये कार्यवाही पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. तरी यापुढे महिन्यातून किमान एका गावामध्ये या समितीमार्फत धाडी टाकून याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी याबाबत आपलेस्तरावरुन तात्काळ कार्यवाही सुरु करणेत यावी.

Shoumika

Bhemma

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प.कोल्हापूर

अध्यक्षा,
जि.प.कोल्हापूर